## जाहीर निवीदा सुचना क्र.०१/२०१७

विषय:- मध्यवर्ती प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथील उपहारगृह चालविण्याकरीता निविदा.

१. मध्यवर्ती प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथील उपहारगृह चालविण्याकरीता ठेका दिल्याच्या दिनांकापासून पुढिल ०३ वर्षाच्या कालावधीसाठी कार्यालयातील सर्व अतिथी अधिकारी, पदाधिकारी व शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोयीकरीता चहा, नाष्टा व जेवण पुरविण्यासाठी मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

२. सदर निविदेचा नमुना फॉर्म, अटी व शर्ती दर्शविणारे प्रपत्रासह रूपये २५०/- (अक्षरी रूपये दोनशे पन्नास मात्र) रोख (नापरतावा) रक्कम भरून दि.३०/१०/२०१७ ते १०/११/२०१७ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत खालील पत्यावर मिळेल. निविदा फॉर्म टपालाने पाठविला जाणार नाही. किंवा टपालामार्फत आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

३. सदर निविदेतील लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा) व लिफाफा क्र.२ (व्यापारी लिफाफा) संपूर्ण भरुन ते दोन्ही लिफाफे एका मोठ्या पाकीटात टाकून त्या पाकीटावर **मध्यवर्ती प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथील उपहारगृह चालविण्याकरीता निविदा सन २०१७** असे नमुद करून सादर करावे.

४. निविदा दाखल करण्याची अंतिम मुदत दि.१०/११/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत आहे.

५. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा दि.१३/११/२०१७ रोजी दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येतील.

निविदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण :-
नायब तहसिलदार (प्रशासन),
जिल्हाधिकारी कार्यालय,नंदुरबार

26/10/17

स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी, नंदुरबार यांची स्वाक्षरी असे }

(अनिल न.पवार)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी नंदुरबार करीता

Scanned by CamScanner